धनादेशाद्वारे शासकीय अर्थव्यवहार.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक एमटीआर-१०७९/सीआर-१५७/एडीएम-९.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ फेब्रुवारी १९८०.

CR1980020101

## परिपत्रक

शासकीय अर्थव्यवहारांत धनादेशांचा वापर वाढत्या अर्थव्यवहाराच्या दृष्टीने व बँकेच्या सोयी उपलब्ध होत असल्यामुळे उत्तरोत्तर वाढणे क्रमप्राप्त आहे. कोषागार अधिकाऱ्यांशिवाय ज्या विभागीय अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे असे विभागीय अधिकारीही धनादेश काढतात. विभागीय अधिकाऱ्यांनी काढलेल्या धनादेशांत अनधिकृत फेरफार करून मूळ रकमेपेक्षा अधिक रक्कम उचलण्याचे एक दोन प्रयत्न शासनाच्या नजरेस आले आहेत. त्यामुळे असे प्रकार होऊ नयेत ह्या दृष्टीने काय करणे आवश्यक आहे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. महालेखापालांशी विचारविनिमय केल्यानंतर ह्या प्रकरणी शासनाकडून पुढील सूचना धनादेश काढणाऱ्या सर्व विभागीय अधिकाऱ्यांना देण्यांत येत आहेत.

२. महाराष्ट्र कोषागार नियमावलीतील नियम १९९(४) मधील सूचनांचे पालन करणे आवश्यक असून शिवाय रुपये १०००/- किंवा त्याहून अधिक रकमेचे धनादेश काढण्यांत येतील तेव्हां विभागीय अधिकाऱ्यांनी अशा धनादेशासाठी एक सूचनापत्रिका कार्बन प्रतीसह तयार करावी व ती त्यांचे धनादेश वटविणाऱ्या बँकेस/कोषागार वा उपकोषागारास धनादेश त्यांचेकडे वटविण्यास जाण्यापूर्वी त्यांना मिळेल अशा बेताने मोहोरबंद लखोट्यातून पाठवावी. आवश्यक असेल तेथे दिवसांत एकापेक्षां अधिक वेळा अशी पत्रिका पाठविण्यांत यावी. सदरहू सूचनापत्रिका ह्या परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार असावी आणि तींतील नोंदी धनादेश काढतानांच करण्यांत याव्यात. नंतर सूचनापत्रिका एका लखोट्यांत मोहोरबंद करून धनादेश वटविणाऱ्या व्यक्तिबरोबर न पाठविता कार्यालयांतील अन्य व्यक्तिबरोबर संबंधित बँकेकडे/कोषागार वा उपकोषागाराकडे पाठवावी. जर अशा तऱ्हेने अन्य व्यक्तिबरोबर सूचनापत्रिका पाठविणे शक्य नसेल तर संबंधित अधिकाऱ्याने आपल्या समक्ष लखोटा मोहोरबंद करून त्यावर स्वतःच्या वैयक्तिक खुणा अशा तऱ्हेने कराव्यात की, जेणेकरून लखोटा अधिकृत व्यक्तिशिवाय (बँक/कोषागार वा उपकोषागार अधिकारी/इतर कोणीही उघडला असल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांच्या लक्षांत येईल. त्याचप्रमाणे अशी सूचनापत्रिका संबंधित बँक/कोषागार व उपकोषागारास धनादेश बँकेकडे/कोषागाराकडे किंवा उपकोषागाराकडे वटविण्यासाठी जाण्यापूर्वी पोहोचतील अशी काळजी घेणेही आवश्यक राहील. अन्यथा असे धनादेश न वटल्यामुळे सचोटीच्या व्यक्तिसही त्रास होण्याची जी शक्यता आहे ती टाळणे आवश्यक आहे.

३. सदरहू आदेश १ मे १९८० पासून अंमलात येतील.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच विभाग प्रमुखांनी त्यांच्या अंमलाखाली असणाऱ्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या ज्यांना स्वतःस शासकीय देणी धनादेशाद्वारे देण्याचे अधिकार आहेत -- लक्षांत वरील सूचना त्वरित अंमलबजावणीसाठी आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल ह्यांचे आदेशाने व नावाने,

गो. भा. ओक,
उप सचिव, वित्त विभाग.

एच-१२९९(७,०००+ ५-२-८०) (कृ आ प.)

प्रत-आश्वासन अधिकारी-ई-१

प्रत अग्रेषित:-

(१) सर्व मंत्रालयीन विभाग,
(२) सर्व विभाग प्रमुख,
(३) सर्व कार्यालय प्रमुख,
*(४) मुख्य लेखापाल, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, केंद्रीय कार्यालय, मुंबई ४०० ००१,
*(५) महा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई ४०० ०२१,
*(६) महा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, गन फाउंड्री रोड, हैदराबाद,
*(७) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*(८) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*(९) सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*(१०) सचिव, लोक सेवा आयोग, मुंबई,
*(११) सचिव, लोकायुक्त व उपलोकायुक्त कार्यालय, मुंबई ४०० ०२१,
(१२) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२१,
(१३) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ०२० (अनौपचारीक संदर्भ क्रमांक टीएम/१९/ पीडब्ल्यू/३९/७७-७८/२९३९/दिनांकित १२ डिसेंबर १९७९,
(१४) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,

*(पत्राने)

K.W.RC

for S.C.S D.L.R. Pune

## परिशिष्ट

### धनादेशासंबंधी सूचना पत्रिकेचा नमुना

| अनुक्रमांक | धनादेश क्रमांक व दिनांक | धनादेशाची रक्कम | धनादेश ज्यांचे नावे काढला असेल त्याचे नाव |
|---|---|---|---|
| | | | |

1248

क्र. लेखा-२६४८/आआड.१६११/अ-३/८०
पुणे दि. ३१-३-८०

प्रत- सर्व उपअधीक्षक भूमि अभिलेख यांना माहितीसाठी

प्रत- का. अ. ई-१

प्रत- आर्थासन अधिकारी- ई-१

भूमापन आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म. रा.), पुणे
यांचे करिता.

एन-१२९९(७,०००+५-२-८०)-अ